# महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

## नागरिकांची सनद

(सिटीझन्स चार्टर)

### (ग्राम विकास व जलसंधारण विभाग)

# महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद

## नागरिकाची सनद

**प्रस्तावना-**

केंद्र शासनाने स्वीकृत केलेल्या तांत्रिक मानकानुसार व मार्गदर्शक तत्वानुसार, जनतेच्या सहभागाने, गावकऱ्यांच्या तसेच अशासकीय संघटनांच्या सहभागाव्दारे जलसंधारण व पाणलोट विकास कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला. या उद्दीष्टपूर्तीसाठी राज्यात पाटबंधारे प्रकल्प यासह जलसंधारण कामांचे प्रचलन,प्रवर्तन आणि शीघ्र विकास व नियमन करण्याकरिता विशेष तरतूदी करण्यासाठी (सन २००० चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१३) प्रस्थापित केला व नंतर उक्त अध्यादेशाचे महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अधिनियम,२००० (सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३) मध्ये रुपांतर करण्यात आले.

**महामंडळाची स्थापना व व्याप्ती-**

महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाची स्थापना दि.२२ ऑगस्ट, २००० रोजी झाली असून, त्याचे मुख्यालय औरंगाबाद येथे आहे. महामंडळ निगम निकाय असून त्याच्या स्थापनेचा मुख्य उद्देश राज्यातील २५० हेक्टर पर्यंतच्या सिंचन क्षमतेच्या लघु पाटबंधारे प्रकल्प व जलसंधारण कामांचे प्रचलन, प्रवर्तन आणि शीघ्र विकास व नियमन करणे हा आहे.

**महामंडळाची घटना-**

महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अधिनियम २०००चे कलम ४ (१) अन्वये महामंडळात खालील सदस्यांचा समावेश आहे:-

| अ.क्र. | पदाधिकारी | पद |
|---|---|---|
| १ | जलसंधारण मंत्री | पदसिध्द अध्यक्ष |
| २ | जलसंधारण राज्य मंत्री | पदसिध्द उपाध्यक्ष |
| ३ | कृषि मंत्री | पदसिध्द सदस्य |
| ४ | जलसंपदा मंत्री | पदसिध्द सदस्य |
| ५ | शासन सचिव,नियोजन विभाग | पदसिध्द सदस्य |
| ६ | शासन सचिव,वन विभाग | पदसिध्द सदस्य |
| ७ | शासन सचिव, कृषि विभाग | पदसिध्द सदस्य |
| ८ | शासन सचिव,जलसंपदा विभाग | पदसिध्द सदस्य |
| ९ | शासन सचिव, जलसंधारण/रोहयो विभाग | पदसिध्द सदस्य |

| अ.क्र. | पदाधिकारी | पद |
|---|---|---|
| १० | शासन सचिव, ग्रामविकास विभाग | पदसिध्द सदस्य |
| ११ | संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदना उपयोजना केंद्र, नागपूर | पदसिध्द सदस्य |
| १२ | संचालक,भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे | पदसिध्द सदस्य |
| १३ | व्यवस्थापकीय संचालक, | पदसिध्द सदस्य सचिव |
| १४ | महाराष्ट्र विधानसभेच्या सदस्यांमधून राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे दोन सदस्य | सदस्य |
| १५ | महाराष्ट्र विधान परिषदेच्या सदस्यामधून राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे दोन सदस्य | सदस्य |
| १६ | पाटबंधारे क्षेत्रातील विशेष माहिती व प्रत्यक्ष अनुभव असलेला,राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचा एक सदस्य | सदस्य |
| १७ | आर्थिक क्षेत्राची विशेष माहिती असलेला, राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचा एक सदस्य | सदस्य |

**कार्यकारी समिती -**

अधिनियमातील कलम ५ व महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ (सुधारणा) अधिनियम,२००१ (सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२०) अनुसार महामंडळाच्या कार्यकारी समितीत खालील सदस्यांचा समावेश आहे.

| अ.क्र. | सदस्य | पद |
|---|---|---|
| १ | महामंडळाचे अध्यक्ष | अध्यक्ष |
| २ | महामंडळाचे उपाध्यक्ष | उपाध्यक्ष |
| ३ | महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक. | सदस्य सचिव |
| ४ | मुख्य अभियंता, पाटबंधारे प्रकल्प(स्थानिक क्षेत्र), पुणे | सदस्य |
| ५ | संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे | सदस्य |
| ६ | प्रधान मुख्य वन संरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, पुणे. | सदस्य |
| ७ | महामंडळाचे मुख्य लेखा व लेखा परीक्षा अधिकारी. | सदस्य |

महामंडळाने/कार्यकारी समितीने मंजूर केलेली कामे कार्यान्वित करण्यासाठी महामंडळाची स्वतंत्र यंत्रणा नाही.सदर कामे मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) पुणे यांच्या मुख्यालय,मंडळ कार्यालय व जिल्हा कार्यालयामार्फत कार्यान्वित करण्यात येतात.

कार्यकारी अभियंता यांचे स्तरावर योजनेचे अंदाजपत्रक तयार होण्यासाठी तीन महिने, महामंडळाचे स्तरावर कामास मंजूरी प्रदान करण्यासाठी एक ते दोन महिने, निविदा प्रक्रिया

पूर्ण करण्यास साधारणत: एक ते दीड महिना, महामंडळाचे स्तरावर निविदा मंजूर होण्यास एक महिना लागतो.

कामाचे आदेश दिल्यानंतर कामाचे स्वरूपानुसार काम पूर्ण करण्यात येते.कार्यपूर्तीस होणारा विलंब वा अन्य काही गाऱ्हाणी असल्यास त्यासंबंधी व्यवस्थाकीय संचालक,महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ औरंगाबाद यांचेकडे तक्रार नोंदविता येईल.त्याचा दूरध्वनी क्रमांक ०२४०-२३६१२४४ व email- mwccabd.co.in असा आहे.

जलसंधारण महामंडळाच्या संबंधित नियम, अधिनियम, शासन निर्णय www.maharashtra.gov.in व http://waterconserve.maharashtra.gov.in या शासनाच्या जलसंधारण विभागाच्या संकेतस्थळावर(वेबसाईटवर) उपलब्ध करण्यात आले आहेत.

नागरिकांची सनदेच्या उपयुक्ततेबाबत तथा परिणामकारकतेचा आढावा जलसंधारण विभागाकडून दरवर्षी घेण्यात येईल व त्यात आवश्यक्तेनुसार बदल करण्यात येतील.

-----------

| अ. क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| १ | महामंडळाची स्थापना, मुख्यालय | महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाची स्थापना औरंगाबाद येथे दिनांक २२.०८.२००० रोजी झाली. |
| २ | महामंडळामार्फत कोणती कामे केली जातात व त्याचे कार्यक्षेत्र काय आहे. | राज्यातील २५० हेक्टरपर्यंत सिंचन क्षमता असलेली लघु सिंचन प्रकल्प राबविण्याचे काम महामंडळ करते. मुख्य अभियंता लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, पुणे, यांचे अधिनस्त असलेल्या आस्थापनेमार्फत ही कामे कार्यान्वित केली जातात. |
| ३ | ० ते २५० हेक्टर सिंचन क्षमता असलेली लघु पाटबंधारे प्रकल्प हाती घेण्यासाठी कोण अर्ज करू शकतो व कोणाकडे अर्ज करावा. | कोणताही नागरिक अथवा लोकप्रतिनिधी २५० हेक्टरपर्यंत सिंचन क्षमता असलेली लघु सिंचन प्रकल्प हाती घेण्यासाठी संबंधित जिल्ह्याच्या/विभागाच्या कार्यकारी अभियंता (जलसंधारण) यांचेकडे अर्ज करता येईल. अर्ज साध्या कागदावर करावा. (विहित नमुना नाही) |
| ४ | अर्ज/मागणी प्राप्त झाल्यानंतरची कार्यपध्दती | अर्ज/मागणी प्राप्त झाल्यानंतर संबंधित कार्यकारी अभियंता हे खालील कार्यपध्दतीचा अवलंब करतात-<br>अ)सदरची योजना तांत्रिक व आर्थिक दृष्टया फलदायी असल्याची खात्री करतात.<br>ब) त्याची योग्यता पटल्यानंतर त्या योजनेचे अंदाजपत्रक तयार करून मुख्य अभियंता, लघु सिंचन(जलसंधारण), पुणे यांचेमार्फत महामंडळाकडे सादर करतात.<br>क) अंदाजपत्रकीय किंमत रूपये १० कोटीपेक्षा कमी असल्यास महामंडळाच्या कार्यकारी समितीच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात येते.<br>ड) अंदाजपत्रकीय किंमत रूपये १० कोटीपेक्षा जास्त असल्यास महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी ठेवले जाते.<br>इ) कार्यकारी समिती/संचालक मंडळाने मान्यता प्रदान केल्यानंतर मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण), पुणे यांचेमार्फत संबंधित अधीक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता यांच्याकडे निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी कळविण्यात येते.<br>ई) संबंधितांच्या स्तरावर निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निविदा मान्यतेचा प्रस्ताव मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण), पुणे यांचेमार्फत संबंधित अधीक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता यांच्या मार्फत महामंडळाकडे सादर केला जातो.<br>फ) कार्यकारी समिती/संचालक मंडळाने मान्यता प्रदान |

| अ. क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| | | केल्यानंतर मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण), पुणे यांचेमार्फत संबंधित अधीक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता यांना संबंधित ठेकेदारास कामाचे आदेश निर्गमित करण्यासाठी कळविले जाते. |
| ५ | वरील प्रक्रिया पूर्ण होण्यास साधारणत: किती कालावधी लागतो. | अ)कार्यकारी अभियंता यांचे स्तरावर योजनेचे अंदाजपत्रक तयार होईपर्यंत सर्वसाधारणपणे तीन महिने.<br>ब)महामंडळाच्या स्तरावर कामास मंजुरी प्रदान करण्यासाठी एक ते दोन महिने.<br>क)निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यास साधारणत: एक ते दीड महिना.<br>ड) महामंडळ स्तरावर निविदा मंजूर होण्यास एक महिना.<br>इ) कामाचे आदेश दिल्यानंतर कामाचे स्वरूपानुसार काम<br>पूर्ण करण्यात येते. |
| ६ | कामांची देयके कोण तयार करतात व ती कशी चुकती केली जातात | अ)कामाच्या प्रगतीनुसार क्षेत्रीय स्तरावर कामांची तपासणी करून मोजमाप पुस्तकांत नोंदी घेऊन त्याची देयके कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयांतून मंजूर करून देयकाची रक्कम प्रदानासाठी महामंडळाकडे पाठविली जातात.<br>ब) महामंडळ कार्यालयात देयकांची छाननी होऊन महामंडळाकडून संबंधित ठेकेदारांस धनादेशाद्वारे देयकाची रक्कम प्रदान करण्यात येते. तत्पूर्वी या कामासाठी आवश्यक असलेल्या निधीची मागणी शासनाकडे सादर केली जाते व निधी प्राप्त झाल्यानंतरच देयकाची रक्कम प्रदान करण्यात येते. |
| ७ | प्रकल्प/योजना पूर्ण होण्यासाठी किती कालावधी लागतो | प्रकल्पाचे स्वरूपानुसार कालावधी लागतो. |
| ८ | कामांच्या बाबतीत कोणास तक्रार नोंदवावयाची असल्यास कोणाकडे नोंदवावी. | महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालकाच्या कार्यालयांत तक्रार नोंदविता येईल. |
| ९ | महामंडळामार्फत राबविल्या जाणाऱ्या कामासाठी निधी कोठून उपलब्ध होतो. | महामंडळाकडून दरवर्षी शासनास वार्षिक अंदाजपत्रक सादर करण्यात येते.ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या मागण्यामध्ये त्याचा समोवश केला जातो व विधान मंडळाच्या मंजुरीनुसार महामंडळास निधी उपलब्ध करण्यात येतो. |

---------